



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार १४ ऑक्टोबर २०२४ | अंक ३०८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# नारायणगड येथील दसरा मेळाव्यात रेकॉर्ड ब्रेक गर्दी

## एक मराठा लाख मराठा घोषणानी आवघा महाराष्ट्र दणानला

### श्री क्षेत्र नारायण गड येथील दोन कोटी पेक्षा अधिक भाविक भक्त दसरा मेळाव्याला उपस्थित




**मनोज जरांगेंनी मराठा समाजाकडून घेतलं वचन**

मनोज जरांगे पाटील यांनी नारायण गडावरून बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांकडून शब्द घेतला. मला एकच वचन द्या, मला तुमच्याकडून जास्त काही नको. तुम्ही मला एकच वचन द्या. मग मी मात्र तुम्ही म्हणाल ते करेल. फक्त हट्ट धरू नका. एकच वचन द्या, असं जरांगे म्हणाले नारायण गडावरच्या सभेत म्हणालेत.जर आपल्या राज्यातील जनतेवर अन्याय झाला आणि एकदा सांगितलं हेच करायचं तर तुम्हाला तेच करावे लागेल, मला हे वचन द्या. मी कधीच तुमच्या शब्दाच्या पुढे जाणार नाही. पण मला तुमच्याकडून एकच वचन हवे. मला राजकारण आणि जातीचं या गडावरून बोलायचं नाही. तुमचं हित सोडून मी तुमच्या पुढे जाणार नाही, तुमचं काम सोडून जाणरा नाही हा गडावरून शब्द देतो, असं मनोज जरांगे म्हणालेत.

बीड प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले
श्री क्षेत्र नारायण गड येथे दोन कोटी अधिक भाविक भक्ताचे उपस्थितीत दसरा मेळावा साजरा करण्यात आला होते. . यावेळी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, आचारसंहिता लागण्यापूर्वी आमच्या सर्व मागण्या मान्य करा. आम्हाला न्याय द्या. आम्हाला न्याय मिळाला नाही तर सरकार उलथून टाकू, आम्ही शांत बसणार नाही . श्री क्षेत्र नारायणगड वरून दंड थोपटले आहेत.

श्रीक्षेत्र नारायणगड येथे मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत व महंत ह.भ.प. शिवाजी महाराज व यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रात्री पासूनच श्रीक्षेत्र नारायणगड परिसरात लाखो भाविक दाखल झाले होते. पारंपारीक पद्धतीने पालखीची मिरवणूक काढण्यात आल्या नंतर सोनं वाटप करुन मुख्य सभेला सुरुवात करण्यात आली








72 गावांमध्ये गावोगावी जाऊन दसरा मेळाव्यांचे सायकल वरून आमंत्रण दिले

## संयम धरा, विजय नक्की आपलाच

मी तुमचे उपकार कधीच विसरणार नाही. तुम्हाला थोडं मोकळं सोडलं असतं ना तर तुम्ही भयानक कार्यक्रम लावला असता. मला काही लोक म्हटले आपण कधीच गप्प बसलो नाही. खरं आहे. आपण कधीच गप्प बसत नाही. आपण कर्माने क्षत्रिय आहे. आपण काय करायचं चालत राहायचं. मी चालत आहे. तुमचे लेकरं मोठी व्हावेत म्हणून मी सहन करतोय. नाही तर मी विचित्र प्राणी आहे. एखाद्या शब्दाची चूक झाली तर समाजाला ते सहन करावं लागेल. म्हणून मी गप्प बसतोय. नाही तर इथून हाणत हाणत निघालो तर गुजरात आणि हरियाणा, पानीपत आणि कटकपर्यंत हाणत हाणत जाणारा हा समाज आहे. तो समाज हा गप्प कसा आहे. आपल्याला टोकलं जात आहे. आपला विजय होत आहे. त्यामुळे संयम धरा. विजय नक्की आहे, असे ते म्हणाले.

दसऱ्याचा सण... बीडमधील नारायण गडावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा सुरु आहे. प्रथम या जनसमुदायाच्या चरणी मी मनापासून नतमस्तक होत आहे. खरंच वाटलं नव्हतं एवढी गर्दी होईल. मी खोटं बोलत नाही. अर्ध्याच्यावर लोकं सरकारी दवाखान्यात जातील. नजर जाईल एवढे लोकं येतील असं खरंच वाटलं नव्हतं. मला एकजण म्हणाला, ह्यँ ह्यँ केलं. ५०० एकर असतं का कुठं असं म्हणत होता. आता तो दिसत नाही. मी मीडियाला कधीच विनंती केली नाही. पण आता करतो. चारही बाजूला कॅमेरे फिरवा. तुम्ही फ्रेम दिले असले तरी एकदा मात्र हा जनसमुदाय राज्याला दिसू द्या. कानाकोपऱ्यातील बांधव दिसू द्या. एकदा दाखवाच. नुसती गर्दी पाहूनच त्यांचा कार्यक्रम होईल, असं जरांगे म्हणाले. आमच्यावरच अन्याय का?, जगागीरदाराची अवलाद आली तरी मराठा समाज झुकणार नाही, असंही जरांगे म्हणाले. मनोज जरांगे काय म्हणाले?पाडळशिंगी पर्यंत चारही मार्ग लॉक आहे. बीडमध्ये सर्व रस्ते जाम आहेत. कधी वाटलं नव्हतं आपण या ताकदीने एकत्र याल म्हणून. हा जनसमुदाय न्यायाचा आहे. एका दुखाकडून सुखाकडे जायचं आहे. या समुदायावर संस्कार आहेत. संस्कार. ते संस्कार कधीच जातीवाद करत नाहीत. प्रचंड ताकदीने असणारा हा समुदाय आहे. या राज्यावर समुद्रासारखा पसरला आहे. पण कधीच मस्तीत आणि मग्रुरीत हा समाज वागत नाही. कधीच हा समुदाय मस्तीत आणि मग्रुरीत वागला नाही. प्रत्येकाला सांभाळण्याचं, साथ देण्याचं काम केलं आहे. यांनी कधी जातीवाद केला नाही. त्यांना कधी जात शिवली नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १४ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com




## बेरोजगारीचे भीषण वास्तव

भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वोधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणाच्या या ऊर्जे चा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ एपिजे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्या सारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने माणावे लागेन कारण आजच्या तरुणाच्या उर्जेचा त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करुन घेता येत नहीं किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टके आहे. २९ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीवर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही, त्यामुळे आहे. उच्च माध्यमिक स्तरा कमीन पात्रता असलेल्या आणि २५ वर्षपिक्षा कमी वयोगटामीन तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टके इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणवर्गापर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जा बेरोजगार असतील तर त्या तरुणवर्गाची मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करणयाची उर्मी आहे. कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करत दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाहीतरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा की पेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी कही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते , शिक्षक भरती त्याचे उत्तम उदाहरण आहे,आज सरकारच्या सर्वंच ठिकाणी रिक्त कर्मचारी पदे आस्ताना एक लिपिक चार चार टेबल सांभाळतो एक शिक्षक चार वर्ग शिकवतो आनेक वर्ष पदोन्नती नाही खाजगी करणाचा निर्णय रद्द करुन काही प्रमाणात का होईना बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काही देणे घेणे नाही, नौकरी मागायला गेलेल्या राजकीय नेते तरुणांना पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करतं आहेत, शिक्षण असूनही नौकरी नाही शेती असुनही शेतात काही मिळत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरावसाची झाली अमेउ, स्वतःचा व्यवसाय करायचा म्हटले तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उदेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईन म्हणूनच सरकारने त्यांच्या हाती रोजगार द्यावा, त्यांचात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करुन घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेतलेखक गोरखनाथ पवार( निंभारी )

९७६३७३८१८०

## विष्णू भाऊ घुले मित्र मंडळाच्या वतीने वाढदिवस विविध उपक्रमानीसाजरा

-केज /(प्रतिनिधी):-भाजपचे युवा नेते विष्णु घुले यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विष्णू भाऊ घुले मित्रमंडळाच्या वतीने आज श्री स्वामी समर्थ वृद्धाश्रम येथे किराणा सामान वाटप, उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णांना फळ वाटप व मुकबधीर मतिमंद निवासी विद्यालय केज येथील मुलांना शालेय साहित्य वाटप करून फळ वाटप केले अशा विविध उपक्रमातून साजरा करण्यात आला.केज येथील सामाजिक कार्यात सर्वात अग्रेसर असणारे नेते म्हणजे विष्णू घुले अशी त्यांची ओळख आज या नेत्याचा वाढदिवस त्यांच्या



या वाढदिवसाच्या निमित्ताणार केज शहरातील वृद्धाश्रम येथे किराणा सामान वाटप उपजिल्हा रुग्णालय फळ वाटप, मुकबधीर शाळा येथे शालीय साहित्य वाटप करून आशा सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या नेत्याचा वाढदिवस साजरा करण्यात आला या वेळीचा वाढदिवस विष्णू भाऊ घुले मित्र मंडळाचे सचिन सिरसाट, चंदू मिसळ, भगत मुळे, नानाभाऊ भांगे, आणा वायबसे, बाबुराव घुले, मल्हारी बारगजे, धनराज लाटे, दत्ता घुले, विक्रम शेप, केशव भांगे, ईश्वर बिक्कड, अभी घाटूळ राजेभाऊ उगले, सुनील शिंदे, दिनुभाऊ घुले, हरिदास घुले, अशोक बारगजे,दिनकर बारगाजे, शिवराज घुले, जयसिंग घुले, गोविंद घुले, संतोष क्षीरसागर, गणेश घुले, मिनीनाथ घुले, राम घुले, प्रकाश बारगाजे, राम घुले, अर्जुन बारगजे, भास्कर घुले, विष्णू घुले, राजेश तिडके, सुखदेव कापरे, बबलू बारगजे, दिगंबर मुंडे, अमोल सावंत, बालाजी मिसाळ, महिंद्रा आंधळे,दत्ता मिसाळ, कृष्णा आघाव, भाऊसाहेबआंधळे, दीपक आंधळे, बीभीषेन आघाव,अमोल मिसाळ, अमोल मुळे, संतोष मिसाळ, दीपक मिसाळ यांच्यासह विष्णू घुले मित्रपरिवारातील सर्व कार्यकर्ते व परिसरातील प्रमुख सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते,डोईफोडे, शिवराम घुले, सोनू सावंत, अविनाश गाताडे, दुर्गादास लांब, सुखदेव कापरे, सतीश घुले, शिवाजी घुले, संतोष घुले, धनराज घुले, दिगंबर घुले, अमोल

## माझ जातीपातीच नाही ,तर सत्व आणि तत्व जपूनच राजकारण ,/ऊसतोड मजुरांचे आयुष्य बदलुण टाकल्याशिवाय मी गप्प बसणार नाही, पंकजाताई मुंडेची दसरा मेळाव्यात गर्जना

--पाटोदा/प्रतिनिधी:- या ऊसतोड मजुरांचं आयुष्य बदलून टाकल्याशिवाय मी शेवटचा श्वास घेणार नाही. पंकजा मुंडे अंधारात एक किंवा उजेडात एक असे कधी वागत नाही. कोणाला अंधारात जावून भेटत नाही. मी गोपीनाथ मुंडेंची लेक आहे. मी कोणाच्या बापलाही घाबरत नाही, अशी डरकाळी आज पंकजाताई मुंडे यांनी फोडली. त्या भगवान भक्तीगडावर आयोजित दसरा मेळाव्यात बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर धनंजय मुंडे, सुजय विखे, प्रीतम मुंडे, सुरेश धस, आर्यमन मुंडे, महादेव जानकर, लक्ष्मण हाके, मोनिका राजळे, शिवाजीराव कर्डीले, मेघना बोडर्डीकर, सदाशीव खाडे, माधव निर्मळ, राधाताई सानप, यश बाळासाहेब आजबे, वाल्मीक कराड वांची उपस्थिती होती.त्या म्हणाल्या, मतदान केल्याशिवाय कोणीही ऊसतोडीला जावू नका. मी सांगितल्याशिवाय कोणी कुठेही जायचे नाही. लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव झाला होता. त्या पराभवानंतर बीडमधील पाच युवकांनी स्वतःचे जीवन संपवले होते. त्याचा उल्लेख पंकजा मुंडे यांनी दसऱ्या मेळाव्याच्या भाषणात केला. तसेच पक्षातील विरोधक आणि विरोधकांनाही इशारा दिला. पंकजा म्हणाल्या, मी गरीबांसाठी काम करणारी आहे. राजकारणाला चिटकून बसणारी नाही. पाच लेकरांनी जीव दिला. त्या आमदारकीचं



काय गोड वाटणार आहे. आमदारकी खासदारकी काही नव्हती, तरीही पाच वर्ष तुम्ही आलात. उद्याही वाल. आपल्याकडे काही असो नसो मी तुमच्या मागे येणारच. जो वंचित आहे, ज्याची पत आणि ऐपत नाही. अशा लोकांसाठी मी राजकारणात आहे. गाड्या घेण्यासाठी नाही. टेबलाखालून पैसे घेण्यासाठी नाही. तुम्ही म्हणता म्हणून मी हेलिकॉप्टरने येते. तुम्ही म्हटला तर बैलगाडीतून येईल, असे दसऱ्या मेळाव्यात बोलताना पंकजा मुंडे यांनी म्हटले.

## डॉ.योगेश क्षीरसागरांकडून भाविकांसाठी अल्पोपहार





बीड (प्रतिनिधी) दि.१२ : पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगड व शिरूर कासार तालुक्यातील नारायणगडावर दसरा मेळाव्यानिमित्त जाणाऱ्या भाविकांसाठी शहरानजिक असलेल्या सैनिकी विद्यालयासमोर मुख्य रोडलगत भाविकांसाठी स्टॉल उभारून अल्पोपहाराची सोय केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर पुढाकारातून हे नियोजन केले आहे. सैनिकी विद्यालयासमोर स्टॉल उभारून दिवसभर अल्पोपहार, पाण्याची सोय केलेली आहे. या मार्गावरून भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या हजारो भाविकांनी अल्पोपहाराचा लाभ घेतला. दरम्यान, डॉ.क्षीरसागर यांच्या यंत्रणेकडून स्टॉल उभारून भाविकांची उत्तम सोय केली होती.

## माजलगाव तहसील कार्यालयावर अमोल शेरकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो लोकांचा मोर्चा दि 11 ऑक्टोबर शुक्रवार रोजीदुपारी 1:00 वाजता धडकला

माजलगाव । प्रतिनिधी:- माजलगाव तालुक्यातील मातंग समाजाच्या विविध मागण्या संदर्भात माजलगाव तहसील कार्यालयावर अमोल शेरकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो लोकांचा मोर्चा दि ११ ऑक्टोबर शुक्रवार रोजीदुपारी१:००वाजता धडकलासत्यशोधकअण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावा याबरोबरच मातंग समाज हा अतिशय उपेक्षित असल्याने त्याचे वर्गीकरण करून त्याला न्याय मिळवून देण्यासंदर्भात करण्यात यावे तसेच महाराष्ट्रात अस्तित्वात असलेले लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाला कायमस्वरूपी चेअरमन देऊन रिक्त जागा भरण्यात यावे व ज्यानी घेतले आहे त्या सर्वांचे कर्ज माफ करण्यात यावे याबरोबरच गायरान धारकांच्या ताब्यात असलेल्या



जमिनी कायमस्वरूपी नावे करून देण्यात यावीत ऊसतोड तालुकास्तरावर वस्तीगृह निर्माण करून मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे अशा विविध मागण्यासंदर्भात माजलगाव तहसील कार्यालयात दि ११ ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी धडकला . या मोर्चात माजलगाव, वडवणी, धारूर या परिसरातून महिलांचा लक्षणीय सहभाग दिसून आला. या मोर्चाचे नेतृत्व अमोल शेरकर यांनी केले हा मोर्चा डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून छत्रपती संभाजी राजे चौक आणि नंतर तहसील कार्यालयावर धडकला. या मोर्चाला पोलीस प्रशासनाकडून बंदोबस्त चोख देण्यात आला होता. या मोर्चाचे निवेदन तहसीलदार यांनी स्वीकारले

## श्री क्षेत्र श्रृंगऋषीगडावर हजारो भावीक भक्तांच्या उपस्थितीत दसरा मेळावा संपन्न,

### धनगर समाजाच्या एसटी आरक्षण व समाजाच्या प्रश्नासाठी काम करणार, यशवंत गायके,

बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी बीड जिल्हा म्हणजे आता दसरा मेळाव्याचे केंद्रबिंदू झाला आहे, जिल्ह्यामध्ये आज तीन ठीकानी दसरा मेळावा झाले, एकीकडे नारायण गडावर खूप मोठ्या प्रमाणात मोठा दसरा मेळावा झाला, दुसरीकडे सावरगाव घाट भगवान भक्ती गड या ठिकाणी दसरा मेळावा झाला, आणि तिसरीकडे धनगर समाजाचा दसरा मेळावा श्री क्षेत्र श्रृंगारुषि गड या ठिकाणी झाला, या ठिकाणी जिल्ह्यातला पहिला धनगर समाजाचा दसरा मेळावा, शिरूर कासार तालुक्यातील श्रीक्षेत्र



श्रृंगारुषी गडावर संपन्न झाला, यावेळी जिल्ह्यातील खूप मोठमोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते, या ठिकाणी गडाचे मंहत सुरेशानंद महाराज शास्त्री यांनी आपट्याचे पूजन करून दसरा मेळाव्याला सुरुवात केली व या प्रसंगी जिल्ह्यातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींची खूप मोठ्या प्रमाणात दिग्गज व्यक्तींची उपस्थिती होती, याप्रसंगी उपस्थित गडाचे महंत सुरेशानंद महाराज शास्त्री, धारूर नगरीचे माजी नगरसेवक संघर्ष नायक यशवंत गायके, युवा मल्हार सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू देवकते, राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर,भगवान माने सर. किरण गावडे,शिवाजी चांगण, रामेश्वर गवळी, राजू शिंदे, लक्ष्मण मस्के, गणेश कोळेकर, माऊली मार्कंड, सापनकर सर, काशीद सर, बाळासाहेब सोलनकर, युवा पत्रकार अंकुश गवळी,निलेश वाघमोडे,परमेशवर कोळेकर,आधी सामाजिक राजकीय क्षेत्रातील परिसरातील खूप मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती, येणाऱ्या काळामध्ये गडावर पुढल्या वर्षी खूप मोठा मेळावा होणार असल्याचे या गडाचे महंत सुरेशानंद महाराज शास्त्री यांनी सांगितले आहे, या दसरा मेळाव्याला महाराष्ट्रातील समाज बांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# माजी मंत्री महादेव जानकर यांचा बीड या ठिकाणी राष्ट्रीय समाज पक्ष कार्यकर्ता मेळावा संपन्न

### गेवराई विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले प्रा अण्णासाहेब मतकर यांना दिले महादेव जानकरंनी आशीर्वाद,

बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी राष्ट्रीय समाज पक्षाचा बीड येथे. माजी मंत्री महादेवजी जानकर साहेब कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला या मेळाव्यामध्ये जानकर साहेबांनी बीड मधील सर्व विधानसभा आपल्याला स्वबळावर लढायचे आहेत असे सांगितले ,व तसेच गेवराई विधानसभा बीड जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर हे लढतील. महाराष्ट्र मध्ये सध्या सर्वच पक्षाच्या जोरदार तयारी चालू आहेत त्यामध्ये राष्ट्रीय समाज पक्ष हा महाराष्ट्रातील 288 जागा लढणार आहे तसेच बीड जिल्ह्यातील सर्व जागा ताकतीने लढणार आहे यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आपली ताकद पणाला लावून गटप्रमुख गणप्रमुख व प्रत्येक गावात कार्यकर्ते तयार केले आहेत ,त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष हा यावेळेस कोणाच्याही विश्वासावर न बसता स्वतः स्वबळावर लढणार आहे असे मत महादेव जानकर साहेब यांनी सर्वांना सांगितले आहे , व सर्व विधानसभा मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार तयार झालेले आहेत प्रस्थापित पक्षावर जनता नाराज झालेली आहे कारण की प्रत्येकाने समाजाला फसवलं आहे समाजातील विकासाचे काम स अपेशी ठरले आहेत फक्त आश्वासन द्यायची आणि लोकांच्या दिशाभूल करायचे याच्यामध्ये पटाईत आहे त्यामुळे जनतेला नवीन पर्याय पाहिजे म्हणून मायबाप जनतेने राष्ट्रीय समाज पक्षासारख्या पक्षाला साथ देऊन येणाऱ्या काळातील आपला विकास करून घ्यावा या कार्यक्रमासाठी सर्व पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते,



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १४ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या नावासाठी माजी सैनिक अनुरथ वीर यांचे तीव्र उपोषण..!




## प्रशासनानी दखल घ्यावी – राजेंद्र मस्के

**बीड (प्रतिनिधी)**
अहिल्यानगर – बीड – परळी रेल्वे मार्गावरील बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी माजी सैनिक अनुरथ सोपान वीर यांचे गेली चार दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर तीव्र अन्नत्याग उपोषण चालू असून, त्यांनी जलत्यागही सुरु केला आहे. प्रशासनाने या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी. वीर यांना ठोस आश्वासन देऊन, उपोषण मागे घेण्यासाठी तातडीने प्रयत्न करावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. आज जिल्हाधिकारी कार्यलयासमोर माजी सैनिक अनुरथ वीर यांचे चालू असलेल्या उपोषण स्थळी राजेंद्र मस्के यांनी भेट देऊन प्रकृतीची चौकशी केली. यावेळी आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते. बीड जिल्हा हा मागास जिल्हा, गतिमान विकासासाठी रेल्वेची गरज असते. अहिल्यानगर – बीड – परळी हा रेल्वे मार्ग होण्यासाठी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, पत्रकार, तरुण युवक अशा विविध क्षेत्रातील अनेकांनी पुढाकार घेऊन, रेल्वे मंजुरीसाठी आंदोलने केली. जनतेची मागणी लक्षात घेऊन, स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी रेल्वे मार्ग मंजुरीसाठी स्वत: पुढाकार घेतला. केंद्र व राज्य सरकारने संयुक्तिकपणे भरीव आर्थिक तरतूद केली. पुढे तत्कालीन खासदार प्रितमताई मुंडे यांनी भाजपा महायुती केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करून निधी आणला. अहिल्यानगर ते आष्टी रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून, पुढील काम अंतिम टप्प्यात आहे. आंदोलनातून मंजूर झालेला रेल्वे मार्ग आणि आता बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचे नाव द्यावे यासाठी आंबेडकरी विचाराचे कार्यकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहेत. माजी सैनिक अनुरथ वीर यांचे उपोषण चालू असून त्यांची प्रकृती गंभीर होऊ लागली आहे. निवृत्त माजी सैनिकाच्या तीव्र उपोषण आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. अशी मागणी राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबा सिद्दिकी यांची गोळ्या झाडुन हत्या---------(सुरक्षाआसुनही हत्या

वृत्तसंस्था :-राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांची मुंबई वांद्रे, पूर्व खैर नगर भागात आमदार झीशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाबाहेरच अज्ञातानी त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला, त्यात बाबा सिद्दिकी यांचा मृत्यू झाला. गोळीबारात गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी ताल्काळ लीलावती रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते परंतु, उपचारा दरम्यानच त्यांचा मृत्यू झाला. पंधरा दिवसापूर्वी बाबा सिद्दिकी यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती, त्यानंतर त्यांना Y दर्जाचे सुरक्षा देण्यात आली होती. परंतु दि. 12 ऑक्टोबर रोजी 9:30 वाजण्याच्या सुमारास तीन अज्ञात व्यक्तींनी बाबा सिद्दीकी यांच्यावर सहा गोळ्या फायर केल्याची माहिती मिळली आहे. गोळीबार करणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून एक हरियाणा व एक उत्तर प्रदेश मधला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तिसऱ्या फराला आरोग्याच्या शोध पोलीस घेत आहेत. बाबा सिद्दिकी हे काँग्रेसचे नेते सलग तीन वेळा आमदार देखील होते शिवाय त्यांनी मंत्री पद भूषविले होते. सद्या ते राष्ट्रवादी अजित पवार गटात होते.



## सरकार आल्यावर प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर बांधणार -श्री.ऊध्दव ठाकरे

मुंबई वृत्तसंस्था:- शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची सुरुवात केली होती. तीच परंपरा आता उद्धव ठाकरे पुढे नेत आहेत. मात्र, शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे असे दोन गट पडले आहेत. या दोन्ही गटांकडून आज स्वतंत्रपणे दसरा मेळावा आयोजित केला होता. महत्त्वाचे म्हणजे यंदाचा दसरा मेळावा विधानसभा निवडणुका तोंडावर असल्याने दोन्ही मेळाव्यांकडे राज्याचे लक्ष लागलं होतं. काही लोक आपल्यावर चालून येत आहेत, त्यांचा राजकीय शिरच्छेद केलाच पाहिजे. आज दसरा रामाने रावणाचा वध केला म्हणून साजरा करतो. प्रभू



रामांबरोबर वानरसेना होती. ते आमचे देव आहेत. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजही आमचे देव आहेत. ते मत मिळवण्याची मशिन नाही. भाजपा मतांसाठी महाराजांचा पुतळा उभारला. त्यातही त्यांनी पैसे खाल्ले, आम्ही प्रत्येक जिल्ह्यात शिवरायांचं मंदिर बांधणार आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## आसोला शाळा व्यवस्थापन समिति बिनविरोध



-----------------------------------किल्लेधारुर / (प्रतिनिधी):- जिल्हापरिषद प्राथमिक शाळा असोला येथे पालक मेळावा आयोजित करण्यात आले. या मेळाव्यात शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली.(दि.१०) ऑक्टोबर रोजी असोला येथे पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालासाहेब बलभीम आडसूळ व उपाध्यक्ष अण्णाभाऊ शिरसट हे होते. प्रमुख पाहुणे सरपंच महादेव चोले होते. शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करताना उपस्थित सदस्यांमधून ५०% महिलांची निवड करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी अलका तुकाराम चोले व उपाध्यक्षपदी श्रीपती तुकाराम वाव्हळ यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. उपस्थित सदस्या मधून पांढरपोटे, समाधान सखाराम, चोले रविकांत श्रीमंत, चोले सरस्वती बालासाहेब, वाव्हळ सचिन, सिताराम श्री. मोरे, मनीषा राहुल, नखाते अंगद नरहरी, अंकुशे भाग्यश्री महादेव, करांडे सखाराम दशरथ, चोले वैशाली लक्ष्मण व जाधव मनीषा भाऊसाहेब यांची स्थापन समिति सदस्य म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकी प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य महादेव चोले, अभिजीत वाव्हळ, मुकादम, सुदाम मोरे, विठ्ठल बोबडे, श्रीकृष्ण कांदे, शिवाजी कोठुळे, विलास आश्रुबा नखाते, श्रीकांत वाव्हळ, कैलास मोरे, सूर्यकांत चोले, सुधाकर मारुती चोले, भाग्यश्री नितीन बोबडे, रोहिणी कांदे, विजय माला मोरे, अनुसया बोबडे व बहुसंख्येने पालक, गावकरी उपस्थित होते

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध विकास कामे व प्रकल्पांचे भूमिपूजन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर नांदेड विधानसभा मतदार संघाचे आमदार बालाजी कल्याणकर यांच्या मतदारसंघातील विविध विकासकामे, प्रकल्पांचे भूमिपूजन केले.
मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या नवा मोंढा नांदेड येथील मुख्य कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्यक्ष विकासकामांच्या ठिकाणी उपस्थित राहून भूमिपूजन केले.
यាप्रसंगी कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री व खासदार अशोक



चव्हाण, मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर,जिल्हाधिकारी अभिजित राऊत, पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, नांदेड वाघाळा महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची उपस्थिती होती.
यामध्ये हनुमान गड परिसरातील राजमाता जिजाऊ सृष्टीचे लोकार्पण. कुसुम सभागृहासमोर पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाचे भूमीपूजन. पावडे वाडी नाका परिसरातील परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठांतर्गत कृषी महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन. नांदेड येथील वाडी उपजिल्हा रूग्णालयाच्या मुख्य इमारतीचे तसेच परिचारिका वसतिगृहाचे भूमीपूजन. पिपल्स व सायन्स कॉलेज परिसरातील कै.नरहर कुरूंदकर यांचे नांदेड येथे उभारण्यात येणाऱ्या स्मारकाच्या बांधकामाचे भूमीपूजन.यासह लेबर कॉलनीतील पाणी पुरवठा सक्षमीकरण व बळकटीकरणाचे भूमीपूजन यासह शहरातील शेतकरी चौक, तरोडा नाका येथे विविध रस्त्यांसाठी भूसंपादनासह सुधारणा आदी कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री यांनी केले.

## केजच्या स्मार्ट श्रीमती विजेत्या रेश्मा बांगर तर उपविजेत्या सुनीता राऊत

केज रोटरी तर्फे दरवर्षी नवरात्र महोत्सवानिमित्त घेतल्या जाणाऱ्या केज स्मार्ट श्रीमती स्पर्धेत केजच्या रेश्मा जीवन बांगर यांनी प्रथम क्रमांक मिळवून केज स्मार्ट श्रीमती बनण्याचा बहुमान मिळवला तर सुनीता संतोष राऊत यांनी उपविजेतेपद पटकावले. विजेत्यांना डिस्ट्रिक्ट पब्लिक इमेज डायरेक्टर रवींद्र बनकर, किशोर दाताळ, केज रोटरी अध्यक्ष प्रकाश कामाजी, हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील सुशील टोपे व नगराध्यक्षा सीता बनसोड यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. रोटरी क्लब ऑफ केज आणि भवानी माता उत्सव समितीच्या वतीने ही स्पर्धा मंगळवारी भवानी



मंदिर प्रांगणात पार पडली. या स्पर्धेत विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत २०० महिलांनीसहभाग नोंदवला होता. निवडफेरी सह इतर चार फेऱ्यानंतर अंतिम फेरी पार पडली. या स्पर्धेत २० पैकी १९ गुण मिळवून रेश्मा जीवन बांगर या प्रथम स्थानी आल्या तर सुनीता संतोष राऊत या दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. या स्पर्धेत केजची मयुरी संतोष राऊत या केजच्या कन्येने आपल्या नोकरीच्या पहिल्या पगारातून पहिल्या चार विजेत्यांना चार पैठणी भेट दिल्या. याबद्दल तिचे कौतुक होत आहे. या स्पर्धेसाठी गिरीराज कलेक्शन, मैत्री कलेक्शन, अभिजित कलेक्शन, कोहिनुर कलेक्शन, अतुल प्रोव्हिजन्स, पांडुरंग मिटकरी, सुरभी एम्पोरियम, पारस मयूर स्वीट होम, व्यंकटेश स्टील सेंटर यांनी विजेत्यांना भेटवस्तू दिल्या. हनुमंत भोसले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रकाश कामाजी यांच्यासह रो अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील, प्रवीण देशपांडे, सूर्यकांत चवरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माजीमंत्री बाबा सिद्दीकी यांची हत्या अल्पसंख्याक समाजावर केलेला राजकीय घात होय



ॲड. प्रा.इलियास इनामदार
बीड प्रतिनिधि: काल संध्याकाळी राष्ट्रवादीचे नेते माजीमंत्री बाबा सिद्दीकी यांची गुंडांनी मुंबई बांद्रा येथे गोळ्या घालून हत्या केली हा हमला म्हणजे अल्पसंख्याक समाजावर केलेला राजकीय घात होय अल्पसंख्याक नेतृत्व संपविण्याचा काही राजकीय समाजकंटकांचा हाथ तर नाही ना? अशी शंका वर्तवली जात आहे एका माजीमंत्रीची सरेआम हत्या होत असेल तर आम नागरिकांच्या सुरक्षेचे काय राज्यात कायदा सुव्यवस्था हाथाळण्यात मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांना अपयश आलेले आहे लोकसेना संघटना या घटनेचा जाहिर निषेध करत असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी घेवून तात्काळ राजीनामे द्यावे अशी मागणी लोकसेना संघटना प्रमुख ॲड. प्रा.इलियास इनामदार यांनी केली आहे.

## पत्रकार करिता महामंडळ; प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या पत्रकार संवाद यात्रेला यश

-------मुंबई (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दीक्षाभूमी ते मंत्रालय काढलेल्या राज्यव्यापी पत्रकार संवाद यात्रेचे फलित मिळाले असून महायुती सरकारने पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते यांच्यासाठी २ स्वतंत्र आर्थिक महामंडळाची गुरूवारी घोषणा केली आहे. सरकारच्या निर्णयाचे पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी स्वागत केले असून राज्यभरातील संघाच्या पत्रकार सदस्यांनी फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष केला आहे. वसंत मुंडे यांनी दीक्षाभूमी ते मंत्रालय अशी तब्बल ६ हजार किमी अंतराची पत्रकार संवाद यात्रा काढून पत्रकारांच्या प्रश्नांकडे सरकार आणि समाजाचे लक्ष वेधले होते. अखेर या लढ्याला यश आले आहे. महाराष्ट्र सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत पत्रकार आणि विक्रेत्यांसाठी स्वतंत्र दोन महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा मागील महिन्यात झाली. मुंबईत यात्रेच्या समारोपाला राज्य सरकारच्यावतीने मंत्री मंगल प्रसाद लोढा आणि



मंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपस्थिती लावून महायुती सरकार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या मागण्याबाबत सकारात्मक असल्याचे आश्वासन दिले होते. लोकशाही प्रणालीत पत्रकार हा समाजातील प्रमुख घटक आहे. पत्रकार हा आर्थिक पातळीवर कसा वंचित आहे, याच्या अनेक कहाण्या पत्रकार वसंत मुंडे यांच्या पत्रकार संवाद यात्रेतून पुढे आल्या. पत्रकार संवाद यात्रेत ठिकठिकाणी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकारांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी लावून धरली होती. याबाबतचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे सुपूर्द केला होता. सत्तारूढ महायुती सरकारने यावर सकारात्मक विचार करून मंत्रिमंडळाने बैठकीत पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते यांच्यासाठी स्वतंत्र २ आर्थिक विकास महामंडळाची घोषणा केली, हे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या आंदोलनाचे, दीक्षाभूमी ते मंत्रालय या राज्यव्यापी पत्रकार संवाद यात्रेचे फलित असल्याने राज्यभरातील पत्रकारांकडून या निर्णयाचे उस्फुर्त स्वागत होत आहे.

## इच्छुकांची गंमत; मतदारांनी सावध राहण्याची गरज!


सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहेत. या अनुषंगाने राजकीय आखाड्यात चांगलेच रमलेल्यांनी आणि नवोत्सुक असलेल्यांनी आपापल्या पद्धतीने आपापल्या शैलीनुसार साम, दाम, दंड, भेद सह जनतेसमोर जाण्याचा किंवा जनतेला आपल्याकडे बोलविण्याचा प्रयत्न चालविला आहे. अशाच प्रकारे काल एका संघटनेच्या सर्वेसर्वा असलेल्या व्यक्तीने पत्रकार परिषद बोलावली. मी जरी पत्रकार म्हणून वृत्तपत्र क्षेत्रात वावरत असलो तरी राजकीय लोकांच्या पत्रकार परिषदांमध्ये कधीच हजेरी लावत नाही. कारण अशा पत्रकार परिषदांमध्ये सत्य आणि वस्तुस्थिती बाजूला सारून ९०% भामटेगिरी, खोटे-नाटे, गोडी-गुलाबीने पत्रकारांच्या समोर मांडले जाते. वस्तुस्थिती मात्र त्यापेक्षा वेगळी असते. असो!

हो तर काल घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये संबंधित व्यक्ती राजकारणी नसल्याने तसेच कुठल्याही पक्षाशी, नेत्याशी साधे कार्यकर्ते म्हणून सुद्धा संलग्न नसल्याने एक मोठ्या सामाजिक संघटनेचे सर्वेसर्वा म्हणून त्यांच्या निमंत्रणावर पत्रकार परिषदेत जातीने उपस्थित राहिलो. तेव्हा राजकारणाचा कुठलाही गंध किंवा अनुभव नसलेल्या या साध्या व्यक्तीने सुरुवातीलाच पत्रकारांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. त्याच मनोगतातून प्रश्न हेरून जेव्हा पत्रकार मंडळी प्रश्नांचा भडीमार करू लागले, तेव्हा अपेक्षेप्रमाणे तो व्यक्ती गडबडला. एवढेच नाही तर त्याने मी पहिल्यांदाच पत्रकार परिषदेला सामोरे जात आहे हे लक्षात घेऊन जरा सोपे प्रश्न विचारा ना राव. अशा अवघड प्रश्नांचा भडीमार तोफगोळ्यासारखा माझ्यावर करू नका. मी गोंधळतोय, असे साधे सरळपणाने सांगून टाकले. त्या व्यक्तीची ही अवस्था पाहता राजकीय क्षेत्र हा त्या माणसाचा पिंड नाही. यावर पत्रकार परिषदेत जमलेल्या पत्रकारांमध्ये कुजबूज सुरू झाली. कुणी आपण विचारलेल्या प्रश्नानंतर कशी घाबरगुंडी उडाली, यावर बोलत होते तर कुणी राजकारण हा त्यांचा प्रांत नाही असे म्हणत होते. असो!

एकदाची ही पत्रकार परिषद अवघ्या अर्धा तासाच्या आतच संपली आणि त्यानंतर संबंधित इच्छुक व्यक्तीकडून ठेवण्यात आलेल्या जेवणाचा आस्वाद उपस्थित सर्व पत्रकारांनी घेतला आणि आपापल्या मार्गाला लागले. आज सकाळी व संध्याकाळी येणारी वृत्तपत्रे चाळून पाहिल्यानंतर एकाध दुसरा अपवाद वगळता त्या पत्रकार परिषदेची बातमी वृत्तपत्रात दिसलीच नाही. याचाच अर्थ त्या व्यक्तीला पत्रकार परिषदेत उपस्थित असलेल्या जवळपास ५० पत्रकारांनी उमेदवार म्हणून नाकारले, असा घ्यावा का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

कारण तत्पूर्वी या पत्रकार परिषदेत मोजक्याच पत्रकारांनी मोजकेच आणि तीही नेहमीचीच प्रश्न विचारली असता त्यावर त्या व्यक्तीकडून आलेली उत्तरे अत्यंत गमतीशीर होती. किंबहुना त्या उत्तरातून राजकीय अपरिपक्वता दिसत होती. पत्रकाराने विचारले, तुम्हाला सामाजिक कार्य करता-करता असे का वाटू लागले की तुम्ही विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरावे आणि निवडणूक लढवावी? तर यावर त्या व्यक्तीचे उत्तर होते, राजकारणात येणे किंवा निवडणूक लढविणे माझ्या ध्यानीमनी नव्हते परंतु तुम्हीच पत्रकारांनी आपापल्या वृत्तपत्रातून मी कसा चांगला उमेदवार राहील, माझे ४० विधानसभा मतदारसंघावर कसे प्रभुत्व आहे? मी आणि आमच्या संघटनेने ठरविले तर या ४० ही विधानसभा मतदारसंघात उमेदवार निवडून ही आणू शकतो किंवा पाडूही शकतो. असे सर्व काही आकडेवारी सहित मांडले, ते सर्व वाचून आणि वारंवार पाहून विचार केला की, सर्वांचीच तशी इच्छा असेल तर उतरावेच राजकारणात आणि आमदारकी लढवावीच म्हणून ही पत्रकार परिषद ठेवून तुम्हा सर्वांना बोलावले. आता या उत्तरात आहे की नाही गंमत म्हणजे कसं बघा. तुमची इच्छा असो किंवा नसो परंतु वृत्तपत्रात पत्रकार लिहितात म्हणून आपण उमेदवार व्हावे असे जर वाटत असेल तर किती हा बालिशपणा. आज कालच्या युगात निवडणुकीत उतरणे, निवडणूक लढविणे आणि जिंकून येणे हे काही येऱ्या-गबाळ्याचे काम नाहीच. त्यासाठी नाकाने केळी सोलून दाखवावी लागते. लोखंडाचे हरभरे चावावे लागतात. शिवाय सगळ्यात मोठी बाब म्हणजे जनतेला मूर्खात काढण्याचा बेरकी आणि हरामीपणा अंगी असावा लागतो. परंतु हा बिचारा नामवंत संघटनेचा सर्वेसर्वा, साधा सरळ, चांगल्या मनाचा माणूस या सर्व बाबी कशाशी खातात याचा गंधही नसलेला, सोज्वळ माणूस. हा माणूस जर खरेच कोणत्याही एखाद्या पक्षाकडून उमेदवार होऊन मैदानात उतरला किंवा कोणत्याही पक्षाने तिकीट दिले नाही तर अशावेळी कोणत्या सेक्युलर पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा हे सुद्धा मनाने ठरवू शकत नसलेला, असे याच व्यक्तीने पत्रकार परिषदेत सांगितले. तर मग अशा व्यक्तीला आपला नेता आपला आमदार म्हणून जनता कशी मान्य करेल? कसे मतदान करेल? असे प्रश्न नक्कीच उपस्थित होतात.

कारण ज्याला स्वतःला राजकारणात गेल्यानंतर नेमके काय करायचे? कसे करायचे? याचा कुठलाही अभ्यास नाही, तर मग तो लबाडांच्या राजकीय दुनियेत कसा जाऊ शकतो? हा प्रश्न सुद्धा उपस्थित होतो आहे. असो!



कारण ज्या व्यक्तीला कोणत्याही पक्षाची काम करण्याची पद्धत माहित नाही. कधी कोणत्या पक्षाची नाळ जुळलेली नाही. राजकीय क्षेत्रात कुठलेही कार्य नाही. स्वतः निवडणुकीत उभे राहून निवडणूक लढविण्याचा अनुभव नाही. आमदार तर दूर कधी नगरसेवकाची निवडणूक सुद्धा लढवली नाही. अशा सर्व नाही असलेल्या बाबी असून सुद्धा फक्त आपल्या हाती एक मोठी संघटना आहे, तीही राजकीय नाही तर सामाजिक आहे. तरीसुद्धा आमदारकीच्या निवडणुकीत उभे राहण्याचे धाडस एक संघटनेचा सर्वेसर्वा कसा करू शकतो? ज्याला राजकारणाचा काहीच गंध नाही. यामुळे काही पत्रकार मंडळी आपसात कुजबूज सुद्धा करत होती की, हेच राजकारणात उतरू इच्छितात की, यांना पडद्यामागून कुणीतरी मदत करत डमी म्हणून पुढे आणून अशा नवख्यांना निवडणुकांच्या मैदानात उतरवून ठराविक जातीच्या किंवा धर्माच्या मतांची विभागणी करून आपले इप्सित किंवा आपली महत्वाकांक्षा साध्य करू पाहत आहे का? की ही व्यक्तीच स्वतः होऊन पुढे येऊन कोणत्यातरी एखाद्या पक्षासोबत आर्थिक देवाणघेवाण करण्याकरिता हे पाऊल उचलत आहे? असेही प्रश्न उपस्थित केले जात होते. असो!

राजकारणी असो की, संघटनात्मक कार्य करणारे असो. ते आपल्या परीने विचार करतात. आपल्याला नेमका कशात फायदा होईल? कोणता मार्ग अवलंबवावा? यासाठी नेहमीच दक्ष व सतर्क राहतात. मात्र मतदार राजा नेहमीच बेसावध असतो. कधी भावनेच्या भरात, कधी जाती धर्माच्या आवेशात तर कधी बोटी आणि चपटीच्या आमिषात तर कधी करकरत्या नोटांच्या आमिषाने मतदानादिवशी मतदान करून मोकळा होतो व नंतर पाच वर्ष तोच मतदार त्याच्याच मतदान करण्याच्या चुकीमुळे निवडून आलेल्या निष्क्रिय लोकप्रतिनिधीच्या नावाने बोंबा मारत फिरत असतो. मजबूत आणि सुदृढ लोकशाही करिता ही शोचनीय बाब आहे. असे होऊ नये नगरसेवक, नगराध्यक्ष, आमदार, खासदार या लोकशाहीच्या पदांसाठी योग्य आणि लायक उमेदवारालाच मतदान करून निवडून आणावे. खोगीरभरती वाढविणाऱ्या इच्छुकांनी अशा कितीही गमती केल्या तरी मतदार राजा हो, मतदान करताना तुम्हाला दक्ष व सावध राहण्याची गरज आहे.

लेखन - एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार)
आसेफ़नगर, बीड.
संपर्क - ९०२१ ०२ ३१२१

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

सोमवार १४ ऑक्टोबर २०२४






# युवाशक्तीचा आज महाएल्गार



## बाजीराव दादा चव्हाण यांची युवाशक्ती उद्या हजारोंच्या संख्येने आपली ताकत दाखवणार.

### युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेस सरनाईक युवाशक्तीला मार्गदर्शन करणार.

बीड प्रतिनिधी : महाराष्ट्राचे लोकप्रिय संवेदनशील मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब व लोकप्रिय खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कार्यतत्परतेला प्रेरित होऊन आज महाराष्ट्रातील तळागाळातील युवावर्ग लाखोच्या संख्येने युवा सेनेसोबत उभे राहत आहेत. युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेस सरनाईक, आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण, हे तळागाळातील युवा सैनिकांना आपल्या सोबत घेऊन महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाडा पिंजून काढत आहे. व युवा सेना अजून मजबूत करण्यासाठी राज्यासह मराठवाडा दौरा करत आहेत. याचेच औचित्य साधून उद्या दिनांक १४/१०/२०२४ रोजी वार सोमवार वेळ ठिक १२ : ३० वाजता आशिर्वाद लॉन्स, सोमेश्वर मंदिर बाजुला, बार्शी रोड बीड येथे होणार आहे. युवासेनेचे राज्य कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक हे या कार्यक्रमात आपली हजेरी लावणार आहेत. या महत्वपूर्ण कार्यक्रमात ते उद्या बीडमध्ये येत असून ते उद्या बीड जिल्ह्यातील तमाम युवा सैनिकांना आपले मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. त्यासोबत आरोग्य दूत बाजीराव चव्हाण आपल्या हजारो युवासैनिक, तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे शेकडो पदाधिकारी, व बीड जिल्ह्यातील असंख्य शिवसैनिक व त्यांचे खंदे समर्थक, कार्यकर्ते यांच्यासह आपली युवाशक्तीची ताकद दाखवून देणार आहेत. युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांचा हा उद्याचा दौरा बीड साठी महत्वपूर्ण माणला जात आहे. या कार्यक्रमात आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण यांची बीडची उमेदवारी व त्यांना येणाऱ्या विधासभेसाठी ग्रीन सिग्नल मिळणार असल्याचेही बीड जिल्ह्यात चर्चा जोरदार होत आहे. त्यामुळे बाजीराव चव्हाण आपल्या पाठीशी हजारोंच्या संख्येने युवाशक्तीची असलेली ताकत दाखवुन देतील अशी सध्या चर्चा आहे. त्यामुळे उद्याच्या या अभुतपुर्व कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील युवाशक्तीने लाखोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवा सेनेचे युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, व युवा सेना बीड जिल्हा प्रमुख सुमित कोळपे, युवा सेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी केले आहे.

# बाबा सिद्दीकी यांच्या अंत्ययात्रेला प्रचंड गर्दी, शोकाकूल वातावरणात नमाज ए जनाजा

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर तीन आरोपींनी गोळ्या झाडल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. सिद्दीकी यांना गोळीबारानंतर तातडीने लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण डॉक्टरांच्या अथक प्रयत्नानंतरही त्यांचं निधन झालं. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. बाबा सिद्दीकी यांच्या मृत्यूनंतर आज सकाळी त्यांचं पार्थिव मुंबई महापालिकेच्या कुपर हॉस्पिटल येथे शवविच्छेदनासाठी आणण्यात आलं होतं. त्यांच्या पार्थिवावर शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर त्यांचं पार्थिव त्यांच्या राहत्या घरी मुंबईत नेण्यात आलं होतं. यानंतर राज्यातील अनेक दिग्गज नेते, बॉलिवूड कलाकार यांनी बाबा सिद्दीकी यांच्या घरी जावून त्यांचं अंत्यदर्शन घेतलं.

बाबा सिद्दिकी यांच्या हत्येचे वृत्त ऐकून प्रचंड धक्का बसला. राज्याची कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे या घटनेमुळे अक्षरशः वेशीवर टांगली गेली. एका ‘Y’ दर्जाची सुरक्षा प्राप्त माजी मंत्र्यांची अशी सरेआम गोळ्या झाडून हत्या केली जाते ही बाब मूळातच राज्य शासन आणि गृहमंत्र्यांचे अपयश अधोरेखित करणारी घटना आहे. या दुःखद प्रसंगी माझ्या संवेदना बाबा सिद्दिकी यांचे पुत्र आमदार झिशान सिद्दिकी यांच्यासोबत आहेत. बाबा सिद्दिकी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**निलेश लंके**




**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री बाबा सिद्धिकी यांना भावपूर्ण श्रद्धांजली. डॉ योगेश भैय्या क्षीरसागर**

काही दिवसापूर्वीच बीडमध्ये आले असता त्यांची भेट झाली होती. अतिशय मनमिळावू असे व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले याचे दुःख होत आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना ! भावपूर्ण श्रद्धांजली

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी राज्यमंत्री, विधिमंडळात प्रदीर्घकाळ राहिलेले माझे सहकारी बाबा सिद्दीकी यांच्यावर झालेल्या गोळीबाराची घटना अत्यंत दुर्दैवी, निषेधार्ह आणि वेदनादायी आहे. या घटनेत त्यांचं निधन झाल्याचं समजून मला धक्का बसला. मी माझा चांगला सहकारी, मित्र गमावला आहे. या भ्याड हल्ल्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. बाबा सिद्दीकी यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या घटनेची सखोल चौकशी करुन हल्लेखोरांवर कडक कारवाई करण्यात येईल. हल्ल्यामागचा सूत्रधारही शोधण्यात येईल. बाबा सिद्दीकी यांच्या निधनामुळे अल्पसंख्याक बांधवांसाठी लढणारा, सर्वधर्मसमभावासाठी प्रयत्न करणारा एक चांगला नेता आपण गमावला आहे. त्यांचं निधन हे राष्ट्रवादी काँग्रेसचं मोठं नुकसान आहे. झिशान सिद्दीकी, सिद्दकी कुटुंबिय आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे.

**अजित पवार**

## कोण आहे बाबा सिद्दीकी?

66 वर्षीय बाबा सिद्दीकी एकदा मंत्री तर तीन वेळा वांद्रे पश्चिमचे आमदार राहिले आहेत. त्यांचा मुलगा झीशान हा वांद्रे पूर्वचा आमदार असून, त्यांनी अद्याप काँग्रेस सोडण्याची घोषणा केलेली नाही. ते मुंबई युवक काँग्रेसचे प्रमुख आहेत. बाबा सिद्दीकी चार दशकांहून अधिक काळ काँग्रेसशी संबंधित होते. मूळचे बिहारचे असलेले बाबा सिद्दिकी यांनी 1990 च्या दशकात मुंबईत निवडणुकीचे राजकारण सुरू केले. 1992 मध्ये ते पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यानंतर 1997 मध्ये त्यांनी पुन्हा विजय मिळवला. बाबा सिद्दीकी 1999 मध्ये पहिल्यांदा आमदार झाले. त्यानंतर 2004 आणि 2009 मध्ये ते पुन्हा विजयी झाले. बाबा सिद्दीकी 2004 ते 2008 या काळात मंत्रीही काही महिन्यांपूर्वीच बाबा सिद्दीकी यांनी यांनी काँग्रेसला रामराम करत राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता. अजित पवार यांच्या गटात प्रवेश केल्यानंतर आता बाबा सिद्दीकी यांच्या मुलावर काँग्रेसने कारवाई केली होती. बाबा सिद्दीकी यांचा मुलगा झिशान सिद्दीकी हे आमदार असून मुंबई युवक काँग्रेसचं अध्यक्षपदाची धुरा त्यांच्याकडे होती. पण आता काँग्रेसने त्यांना पदावरून हटवलं होतं. वडील बाबा सिद्दीकी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. अशीही चर्चा आहे की झिशान सिद्दीकी सुद्धा राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करणार आहेपोलिसांना माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. काही महिन्यांपूर्वीच बाबा सिद्दीकी यांनी यांनी काँग्रेसला रामराम करत राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता. बाहेर पडले होते. बाबा सिद्दिकी हे कार्यालयाजवळ फटाके वाजवत असताना गोळीबार झाला. फटाके फोडत असताना अचानक तीन जण गाडीतून उतरले. तोंडावर रुमाल बांधून हे तीन जण आले होते. त्यानंतर त्यांनी बाबा सिद्दिकी यांच्यावर तीन राऊंड फायर केले. बाबा सिद्दिकी यांच्या कार्यालयाजवळील राम मंदिराजवळ हा गोळीबार झाला. बाबा सिद्दिकी यांना छातीत एक गोळी लागल्यानंतर ते खाली कोसळले. त्यानंतर लोकांनी त्यांना लीलावती रुग्णालयात तातडीने दाखल केलं.मुंबई : राज्याच्या राजकारणाला हादरावून सोडणारी घटना मुंबईत घडली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार झाला आहे. या गोळीबारात बाबा सिद्दिकींचा मृत्यू झाला आहे. त्यांना जवळच्या लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं. त्यांच्यावर तीन जणांनी गोळीबार केला. यातील संशयित तिघांचे फोटो समोर आले आहे. यात एक आरोपी हा हरियाणा इथं राहणार आहे. तर दुसरा आरोपी हा उत्तर प्रदेशमध्ये राहणार आहे. तिसरा आरोपी हा फरार झाला आहे.

माजी मंत्री बाबा सिद्धिकी यांच्या निधनाची बातमी मोठी दुःखद घटना आहे.दसरा दिनी एका मुस्लिम नेत्याला सुनियोजितपणे संपवण्यात आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. आरोपीना अटक झाली पाहिजे. जिशान सिद्दीकी हे आमचे मित्र आहेत. त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.ऑल इंडिया पँथर सेना त्यांच्या दुःखात सहभागी आहे. या घटनेला राजकीय अँगल असल्यास हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला काळिमा फासणारे प्रकरण असेल.या राज्यात चिमुरड्या, महिला, सर्वसामान्य आणि आता नेते सुद्धा ते ही मुंबईत सुरक्षित नाहीत. कायदा व सुव्यवस्था राहिलेलीच नाही.

**दिपक केदार**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com